अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, दादर, मुंबई यांच्या न्यायालयात
(न्यायालय क.५)

केस नंबर ४६/एस.डब्ल्यू/२०१८

जोनीता मोरे
विरूध्द
एलविरा डिसोझा वगैरे

निशाणी कमांक १ वरील आदेश

फिर्यादी यांनी आरोपीविरुध्द खाजगी फिर्याद दाखल केलेली आहे. सदरहु फिर्यादीला अनुषंगुन फिर्यादी यांचे सत्यापन दि. २९.०१.२०१९ रोजी नोंदविण्यात आले होते. त्यानंतर फिर्यादी यांना आदेशीका काढण्याच्या दृष्टीने अतिरिक्त साक्षीदार तपासण्याची मुभा देण्यात आलेली होती. परंतु त्यानंतर आरोपीविरुध्द आदेशिका काढण्याच्या दृष्टीने फिर्यादी यांनी कोणत्याही स्टेप्स घेतलेल्या नाहीत. तसेच त्यानंतर फिर्यादी व त्यांचे वकील कधीही तारखेला हजर रहात नाहीत. तसेच त्यांनी कोणताही अर्ज दिलेला नाही. आजही फिर्यादी व त्यांचे वकीलांना वारंवार पुकारले. दोघेही गैरहजर. कोणताही प्रकारचा अर्ज नाही. सबब सदरचे प्रकरण चालविण्यामध्ये फिर्यादी यांना स्वारस्य नसल्यामुळे प्रस्तुतची केस फौजदारी प्रकिया संहिता कलम २५६ प्रमाणे काढून टाकण्यात येते.

दिनांक : ०९.०७.२०२६

(अभय अ.मेहेंदळे) 09/07/2026
अतिरिक्त मुख्या न्याय दंडाधिकारी,
५ वे न्यायालय, दादर, मुंबई.